पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे 411 008
दूरध्वनी क्रमांक 020-25657878 फॅक्स क्र. 020-25674641 ई मेल
sp.pune.r@mahapolice.gov.in संकेतस्थळ www.puneruralpolice.gov.in
(माहिती अधिकार शाखा : rti.puneruralpolice@gmail.com)

माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम क्रमांक 04 (1) (ख) प्रमाणे पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालयाची (01 ते 17) मुद्यांची माहिती :-

- **कलम क्रमांक 04 (1) (ख) (एक) :-**
- **रचना :-** पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालयाचे अधिनस्त 02 अपर पोलीस अधीक्षक (अपर पोलीस अधीक्षक, पुणे विभाग आणि अपर पोलीस अधीक्षक, बारामती विभाग), 08 उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये (लोणावळा, खेड, जुन्नर, भोर, दौंड, बारामती, शिरुर, हवेली उपविभाग), बऱ्हाणपूर पोलीस उप मुख्यालय आणि 33 पोलीस स्टेशन कार्यरत आहेत.

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालय

कार्यालयाचे नांव	पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.
पत्ता	पाषाण रोड, चव्हाणनगर, पुणे 411008
पोलीस अधीक्षक	श्री.संदीप सिंह गिल्ल (भा.पो.से.)
कार्यालय प्रमुख	पोलीस अधीक्षक
विभागाचे नांव	पोलीस विभाग
मंत्रालयीन विभाग	गृह विभाग
कार्यक्षेत्र / भौगोलिक हद्द	पोलीस आयुक्तालय, पुणे शहर आणि पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांची हद्द वगळता उर्वरीत पुणे जिल्ह्याची हद्द

- **कार्य व कर्तव्ये :-**
- शासनाने ठरवून दिलेले कामकाज, कायदा व सुव्यवस्था राखणे, सुरळीत वाहतूक, गुन्हे प्रतिबंध, गुन्हे शोध, सामाजिक सुरक्षा राखणे.
- पुणे ग्रामीण जिल्हा अधिनस्त 08 उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये आणि 33 पोलीस स्टेशन यांचे कामकाजावर, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेकामी पर्यवेक्षण आणि संनियंत्रण करणे.
- गुंडांच्या टोळया आणि समाजविघातक घटक यांच्या विरुध्दच्या प्रतिबंधक व परिणामकारक कारवाईचे तसेच बेकायदेशीर असलेल्या अग्नीशस्त्र जप्तीच्या कारवाईचे संनियंत्रण करणे.
- पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांच्यात सांघिक भावना वृध्दींगत होण्याच्या दृष्टीकोनातून आणि मनोधैर्य उंचावण्याचे अनुषंगाने नि:पक्षपाती व पारदर्शी नेतृत्व करणे.
- पोलीस दलास भ्रष्टाचार मुक्त व पारदर्शी करण्याचे अनुषंगाने प्रयत्न करणे.
- जनतेच्या जीवन व मालमत्तेचे रक्षण करुन त्यांना त्यांचे दैनंदिन जीवन निर्भयपणे जगता येण्यासाठी प्रयत्न करणे.
- पुणे ग्रामीण जिल्ह्यातील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उप निरीक्षक दर्जाच्या अंमलदारांच्या रजा मंजूरी, पदोन्नतीची दिनांक मंजूर करणे अशा स्वरुपाच्या व इतर प्रशासकीय / प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तींचा नियमोचित वापर करणे. तसेच पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालयातील वाचक पोलीस निरीक्षक / प्रशासकीय अधिकारी / कर्मचारी, वर्ग-04 संवर्गातील कर्मचाऱ्यांचे किरकोळ रजेपासून ते सेवानिवृत्ती विषयक कामकाज पाहणे, पर्यवेक्षण करणे.

Scanned with OKEN Scanner

- **कामाचे विस्तृत स्वरुप** :- कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, गुन्हे तपास, गुन्हा प्रतिबंधक, गुन्हे अन्वेषण, गुन्हे प्रकटीकरण, सार्वजनिक उपद्रव प्रतिबंधक, अटक, दुसऱ्या पोलीस अधिकाऱ्यास त्याचे कर्तव्यात सहाय्य करणे, विकलांग व्यक्तींना सहाय्य करणे, चौकशीकामी ताब्यातील आरोपींची / व्यक्तींची आरोग्य व सुविधा विषयक जबाबदारी, आग व प्राणी इतरांपासून होणारे नुकसानीबाबत कायदेशीर कारवाई, वाहतूक नियंत्रण, शांतता भंगास प्रतिबंध याशिवाय विशेष किंवा न्यायिक आदेशान्वये सोपविण्यात आलेली कर्तव्ये याबाबत संबंधित अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस स्टेशन, प्रभारी अधिकारी यांना मौलिक मार्गदर्शन देणे व त्याप्रमाणे कारवाई करुन अंमलात आणणे.
- **मालमत्तेचा तपशील** :- पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण कार्यालयाची इमारत व आवार
- **उपलब्ध सेवा** :- दूरध्वनी, संगणक, ई-मेल, फॅक्स, ई-मेल, इंटरनेट, नियंत्रण कक्ष-अविरत कार्यरत
- **कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक व वेळा** :-020-25657878, कामकाजाची वेळ :- 09:45 ते 18:15 वाजता (शनिवार, रविवार आणि शासकीय सुट्टी वगळून) आणि नियंत्रण कक्ष अविरत कार्यरत

Scanned with OKEN Scanner

कलम क्रमांक 04 (1) (ख) (दोन) :-

- अधिकारी आणि कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये :- महाराष्ट्र पोलीस अधिनियम, सन 1951 मध्ये पोलीस दलाचे कार्य, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या याबाबत विस्तृतपणे नमूद आहे. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना मदत करण्यासाठी पुढीलप्रमाणे पोलीस कार्यालये मंजूर आहेत.

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण			
अ.क्र.	विभाग	अ.क्र.	विभाग
	अपर पोलीस अधीक्षक, बारामती विभाग		**अपर पोलीस अधीक्षक, पुणे विभाग**
अ)	उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती उपविभाग	अ)	उपविभागीय पोलीस अधिकारी, शिरुर उपविभाग
	1) बारामती शहर पोलीस स्टेशन		1) शिरुर पोलीस स्टेशन
	2) बारामती तालुका पोलीस स्टेशन		2) रांजणगांव एमआयडीसी पोलीस स्टेशन
	3) माळेगांव पोलीस स्टेशन		3) शिक्रापूर पोलीस स्टेशन
	4) वडगांव निंबाळकर पोलीस स्टेशन		
	5) वालचंदनगर पोलीस स्टेशन	ब)	उपविभागीय पोलीस अधिकारी, हवेली उपविभाग
	6) इंदापूर पोलीस स्टेशन		1) हवेली पोलीस स्टेशन
	7) भिगवण पोलीस स्टेशन		2) वेल्हा पोलीस स्टेशन
	8) सुपा पोलीस स्टेशन		3) पौड पोलीस स्टेशन
ब)	उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड उपविभाग	क)	उपविभागीय पोलीस अधिकारी, लोणावळा उपविभाग
	1) दौंड पोलीस स्टेशन		1) लोणावळा शहर पोलीस स्टेशन
	2) यवत पोलीस स्टेशन		2) लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन
	3) ऊरुळीकांचन पोलीस स्टेशन		3) कामशेत पोलीस स्टेशन
			4) वडगांव मावळ पोलीस स्टेशन
क)	उपविभागीय पोलीस अधिकारी, भोर उपविभाग, सासवड		
	1) सासवड पोलीस स्टेशन	ड)	उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड उपविभाग
	2) जेजुरी पोलीस स्टेशन		1) खेड पोलीस स्टेशन
	3) भोर पोलीस स्टेशन		2) मंचर पोलीस स्टेशन
	4) राजगड पोलीस स्टेशन		3) पारगांव पोलीस स्टेशन
			4) घोडेगांव पोलीस स्टेशन
		ड)	उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर उपविभाग
			1) जुन्नर पोलीस स्टेशन
			2) नारायणगांव पोलीस स्टेशन
			3) आळेफाटा पोलीस स्टेशन
			4) ओतूर पोलीस स्टेशन

Scanned with OKEN Scanner

- पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार यांचे यांचे अधिकार आणि कर्तव्ये ():-

अ.क्र.	पदनाम	कार्य, अधिकार / कर्तव्य
1.	पोलीस अधीक्षक	1) पोलीस अधीक्षक यांनी त्यांच्या वैयक्तिक मार्गदर्शनाचा व निर्देशनाचा लाभ आवश्यकतेनुरुप उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना करुन देणे. 2) पोलीस अधीक्षकांनी त्यांच्या नियंत्रणाखालील पोलीस दल योग्यप्रकारे प्रशिक्षित, कार्यक्षम आणि समाधानी ठेवणे व त्याच्या अधिपत्याखालील पोलीस दल त्यांच्या जिल्ह्यातील गुन्ह्यांचा प्रतिबंध, अन्वेषण व तपास करण्याचे काम योग्यप्रकारे व कार्यक्षमता पूर्वक करत असल्याची खातरजमा करणे. त्यांचे अधिनस्त पोलीस स्टेशनला अचानक भेटी देऊन पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे दक्ष आहेत अगर कसे? याची तपासणी करावी. 3) पोलीस अधीक्षकांनी अधून मधून अपराध स्थळांना भेटी देण्यापेक्षा त्यांच्या जिल्ह्यातील गुन्हेगारीच्या समस्यांचाअभ्यास करुन गुन्ह्यांचा साकल्याने परामर्श घ्यावा. संघटीत गुन्ह्यांचा सुगावा लागलेला असेल किंवा संघटीत टोळयांचा ज्यामध्ये हात असेल अशा गंभीर स्वरुपाच्या अपराध्यांच्या तसेच जिल्ह्यातील एकंदर शांतता व सुव्यवस्था यांवर ज्यामुळे लक्षणीय परिणाम होईल, अशा अपराधी स्थळांना भेटी देणे 4) पोलीस अधीक्षकांनी त्यांचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांचेबरोबर सौहार्दपणे वागावे. तपासणी व चौकशी दरम्यान पोलीस अधीक्षक त्यांचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांना सहकार्य करतील. 5) पोलीस अधीक्षकांनी रुग्णालयातील आजारी पोलीस अंमलदारांना आठवडयातून किमान एकदा नियमित भेट द्यावी. आजारी पोलीस अंमलदारांच्या वेतनाच्या संवितरणास कोणत्याही कारणास्तव विलंब होत असेल तर प्रकरणपरत्वे यथोचित कार्यवाही करणे. 6) पोलीस अधीक्षक हे त्यांचे कार्यालयाशी निगडीत प्रदान करण्यात आलेले वित्तीय बाबींचे संनियंत्रण करतील. 7) पोलीस अधीक्षक हे पुणे ग्रामीण जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेसाठी पुरविण्यात येत असलेल्या पोलीस बंदोबस्ताचे पर्यवेक्षण करतील तसेच सर्व प्रकारच्या गुन्ह्यांवर अंकुश ठेवतील.
2.	अपर पोलीस अधीक्षक	1) अपर पोलीस अधीक्षक हे पोलीस अधीक्षक यांना सहाय्यक म्हणून कामकाज पाहतात. 2) अपर पोलीस अधीक्षक यांना त्यांच्या अधिनस्त असलेल्या उपविभागीय पोलीस अधिकारी किंवा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना वेळोवेळी आवश्यकतेनुरुप मौलिक मार्गदर्शन करावे लागते. त्यांच्या अधिनस्त विभागातील देखरेख ठेवण्यासाठी ते सर्वस्वी जबाबदार असतात. 3) अपर पोलीस अधीक्षक हे त्यांच्या विभागातील उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशनकडून त्यांचे कार्यक्षेत्रातील गुन्ह्यांचा प्रतिबंध, अन्वेषण व तपास करण्याचे काम योग्यपणे केले जात आहे अगर कसे? याबाबतची खातरजमा करतील. 4) अपर पोलीस अधीक्षक हे त्यांचे अधिनस्त पोलीस स्टेशनला अनपेक्षित भेटी देतील आणि पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे कर्तव्यावर सतर्क आहे अगर कसे? याची पडताळणी करतील. 5) अपर पोलीस अधीक्षक यांना गुन्हेगारी विषयक समस्यांचा अभ्यास करुन गुन्ह्यांचा साकल्याने परामर्श घेऊन त्याचे अधिपत्याखालील वर्दी मिळालेल्या गंभीर अपराधांच्या ठिकाणी भेट द्यावी लागते.
3.	पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय	1) पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय हे पोलीस अधीक्षकांच्या अनुपस्थितीमध्ये आकस्मिक निकडीचे प्रसंग हाताळतात 2) पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय हे पोलीस अधीक्षकांचे गोपनीय स्वरुपाचे व इतर महत्वाचे टपाल उघडणे, पोलीस अधीक्षक यांच्या अधिनस्त पत्रव्यवहार आणि लेखा शाखांतील कामकाजावर नियंत्रण ठेवणे, नेहमीचा पत्रव्यवहार आणि संकीर्ण काम निकाली काढणे, पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या अनुपस्थित जिल्हा व मुख्यालयातील पोलिसांच्या कामकाजावर नियंत्रण व देखरेख ठेवतात 3) पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय हे पोलीस अधीक्षक मुख्यालयात अनुपस्थित असताना, कंत्राटदारांकडून मिळालेल्या पोषाख व शासकीय सरंजाम वस्तूबाबत आवश्यक ती कार्यवाही करतात 4) मुख्यालयापासून सहज पोहोचता येईल इतक्या अंतरात घडलेल्या गंभीर किंवा महत्वाच्या गुन्ह्यांच्या घटनास्थळांना वरिष्ठ अधिकारी भेट देईपर्यंत प्रारंभिक स्वरुपाच्या भेटी देतात 5) पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय हे पोलीस अधीक्षकांनी जिल्हा कोषागारामध्ये उघडलेले व्यक्तीगत खातेवही लेखे चालवितात
4.	उपविभागीय पोलीस अधिकारी	1) उपविभागीय पोलीस अधिकारी हे त्याच्या प्रभारातील गुन्ह्याविषयीच्या संपूर्ण कामासाठी जबाबदार असतात आणि त्यांनी गंभीर स्वरुपाच्या अपराधाच्या ठिकाणांना भेटी देणे आवश्यक असते. 2) उपविभागीय पोलीस अधिकारी हे पोलीस अधीक्षक यांच्या आदेशानुसार त्यांच्या उपविभागातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची कार्यक्षमता व शिस्त यासाठी जबाबदार असून त्याच्या उपविभागातील पोलीस स्टेशनची व चौक्यांची / दूरक्षेत्राची ठराविक कालांतराने, वर्षातून किमान एकदा तपशीलवार तपासणी करतील. 3) उपविभागीय पोलीस अधिकारी हे त्यांच्या उपविभागातील भाडेतत्वावरील लोकोपयोगी वाहनांची तपासणी, स्फोटक द्रव्ये, शस्त्रे व दारुगोळा यांच्या दुकानांची तपासणी करण्यास, निशाणबाजीच्या तालमी (मस्केट्री) घेण्यास

Scanned with OKEN Scanner

		इत्यादी आणि त्यांच्या नेहमीच्या कामाच्या ओघात त्यांना पार पाडावी लागणारी कामे पार पाडण्यास जबाबदार असतात. 4) उपविभागीय पोलीस अधिकारी यांना ॲट्रॉसिटी सारख्या महत्वाच्या गुन्ह्यांचा तपास स्वत: करावा लागतो. 5) उपविभागीय पोलीस अधिकारी हे त्यांच्या अधिनस्त पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना गरजेनुरुप प्रकरण परत्वे मौलिक मार्गदर्शन करतात. 6) उपविभागीय पोलीस अधिकारी हे केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत त्यांचे उपविभाग अंतर्गत प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून कर्तव्य पार पाडतात. 7) उपविभागीय पोलीस अधिकारी हे 10 वर्षापेक्षा कमी सेवा असलेल्या पोलीस अंमलदार यांचे वार्षिक गोपनीय शेरे लिहीतात तसेच पोलीस अधिकारी यांचे गोपनीय अहवाल लिहीतात. पोलीस स्टेशनच्या कामकाजावर ते नियंत्रक अधिकारी म्हणून कर्तव्य बजावतात.
5.	पोलीस निरीक्षक / पोलीस स्टेशन, प्रभारी अधिकारी	01) पोलीस निरीक्षक / पोलीस स्टेशन, प्रभारी अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील गुन्ह्यांचा प्रतिबंध आणि तपास तसेच त्यांच्या वरीष्ठांचे आदेश अंमलात आणणे. त्यांच्या हाताखालील कर्मचाऱ्यामध्ये योग्यप्रकारे शिस्त राखली जात आहे हे पाहण्यासाठी पोलीस निरीक्षक हे जबाबदार असतात. त्यांनी त्यांचेकडे सोपविण्यात आलेल्या कामाचे सांगोपांग माहिती करुन घ्यावी व त्यांच्या हाताखालील सर्व पोलीस अंमलदार कर्तव्यावर हजर असून कर्तव्यदक्ष आहेत ते पाहावे. सार्वजनिक शांततेस बाधक ठरणारा कोणताही गुन्हा किंवा प्रसंग घडण्याची शक्यता पोलीस निरीक्षक / प्रभारी अधिकारी यांना माहित होईल तेव्हा त्या शक्यतेची माहिती त्यांना जी खबरदारीची उपाययोजना करणे उचित वाटेल त्या उपाययोजनेसह त्यांच्या सर्व वरिष्ट अधिकाऱ्यांना कळवतील. आवश्यकतेनुसार ते शेजारच्या पोलीस स्टेशनच्या पोलीस प्राधिकाऱ्याशी थेट पत्रव्यवहार करतील आणि प्रभारातून निसटून जाणाऱ्या अथवा निसटून जाऊन त्यांच्या प्रभारात येणाऱ्या अपराध्यांना एकडण्यासाठी त्या प्राधिकाऱ्यांबरोबर एकविचाराने कार्यवाही करतील आणि सर्वसाधारण पणे गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्यांचा तपास लावण्यासाठी उपाय योजतील. पोलीस निरीक्षक एखाद्या विशिष्ट प्रकरणांचा तपास व्यक्तीश: / स्वत: हाती घेतील तेव्हा फौजदार हे त्यांच्या आदेशानुसार कार्य करतील. परंतु, इतर बाबतीत ते निरीक्षकांचे सर्वसाधारण निर्देशन व सल्ला यांना अधीन राहून स्वतंत्रपणे कार्य करतील. तथापि, यामुळे ते त्यांच्यावर नमूद जबाबदाऱ्या मधून मुक्त होणार नाही आणि दंडाधिकाऱ्याकडून आदेश मिळाल्याखेरीज पोलिसांना कार्यवाही करणे शक्य होणार नाही. अशी प्रकरणे नसतील तर आदेशासाठी न थांबता ते त्या सर्व प्रकरणांमधील त्यांचे कार्य ताबडतोब सुरु करतील. 02) पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी निर्देश देतील अशारीतीने पोलीस निरीक्षक / प्रभारी अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील पोलिसांची ठराविक काळाने तपासणी करतील. बलातील व्यक्तींनी केलेला कोणताही निष्काळजीपणा, गैरवर्तणूक किंवा आदेशाची अवज्ञा, रजेशिवाय अनुपस्थिती किंवा त्यांना झालेला अपघात यांचे वृत्त पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी यांना तात्काळ कळवतील आणि एकंदरीत त्यांच्या स्वत:च्या पोलीस स्टेशनमधील सुव्यवस्था रक्षणाच्या व्यवस्थेच्या क्षमतेशी संबंधित सर्व बाबींची माहिती वरिष्ठांना सतत पुरवतील. त्यांच्या पोलीस स्टेशनच्या हद्दीबाहेरुन येणाऱ्या गुन्हेगारांच्या लोंढयामुळे किंवा इतर पोलीस स्टेशनकडून सहकार्य न मिळाल्याने पोलीस निरीक्षक / प्रभारी अधिकारी यांना काही अडचणी आल्यास त्या अडचणी वरिष्ठांना कळवतील. 03) पोलीस निरीक्षक / पोलीस स्टेशन, प्रभारी अधिकारी यांनी त्यांच्या अधिपत्याखालील पोलीस चौक्यांची / दूरक्षेत्रांची महिन्यातून निदान एकदा तपासणी करावी व अशावेळी चौक्यामधील त्यांच्या शिपायांना त्यांच्या कर्तव्याबद्दल सूचना द्याव्यात. 04) पोलीस निरीक्षक / पोलीस स्टेशन, प्रभारी अधिकारी यांनी त्यांच्या पोलीस स्टेशनच्या कार्यकक्षेतील विभाग / गावांना भेट देऊन पोलीस भेट, नोंद पुस्तके आणि हजेरीपट तपासावे व नियम 76 मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदी दृष्टीपटला समोर ठेऊन गांवातील गुन्ह्यासंबंधिच्या नोंदवह्या अद्यावत करुन घ्याव्यात. त्यांच्या कार्यकक्षेत घडणाऱ्या चालू घडामोडींची माहिती मिळविण्यासाठी प्रत्येक संधी त्यांनी साधावी आणि त्यांच्या सभोवतालच्या लोकांची विशेषत: गुंड व संशयित व्यक्तींची खरीखुरी माहिती त्यांना असावी. त्यांच्या हाताखालील व्यक्ती बारीकसारीक माहिती मिळविण्यासाठी एकही संधी दवडणार नाही हे पोलीस निरीक्षक यांनी जातीने पाहावे.
6.	राखीव पोलीस निरीक्षक	पोलीस उप निरीक्षक कंपनी ऑर्डली, भांडारपाल, बँडमेजर, पोलीस रोखपाल, लायसन्स, अर्जेट शस्त्र व दारुगोळा इन्चार्ज, कवायत निर्देशक व इतर सहाय्यक पोलीस कर्मचारी यांच्या मदतीने पोलीस मुख्यालयातील कामकाज पाहणे तसेच पोलीस नियमावली 1999 चे भाग 02 व 03 प्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 प्रमाणे मुंबई पोलीस कायदा, 1951 प्रमाणे कार्य व कर्तव्य पार पाडावे.
7.	सहाय्यक पोलीस निरीक्षक / पोलीस स्टेशन प्रभारी	01) सहाय्यक पोलीस निरीक्षक / पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी हे ग्रामीण जिल्ह्यातील पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी म्हणून त्यांचे कर्तव्य पार पाडतात आणि पोलीस निरीक्षक (पोलीस स्टेशन, प्रभारी अधिकारी) यांचेप्रमाणे त्यांना कर्तव्य पार पाडावे लागते. 02) ज्या पोलीस स्टेशनचे प्रभारी हे पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी असतात त्यांना दुय्यम अधिकारी / सहाय्यक म्हणून काम पाहणे.

Scanned with OKEN Scanner

		03) सहाय्यक पोलीस निरीक्षक हे जिल्ह्यात असलेल्या पोलीस स्टेशनमध्ये दाखल होणारे विविध गुन्ह्यांचा तपास पोलीस स्टेशनप्रमाणे किंवा वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे उपलब्ध अधिकारी व अंमलदार यांच्या मदतीने पूर्ण करणे. हद्दीतील धार्मिक कार्यक्रम, उत्सव, बंदोबस्त शांततेत पार पाडणे. तसेच पोलीस नियमामध्ये 1999 चे भाग 02 व 03 प्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 प्रमाणे मुंबई पोलीस कायदा, 1951 प्रमाणे कार्य व कर्तव्य पार पाडावे.
8.	पोलीस उप निरीक्षक	जिल्ह्यात असलेल्या पोलीस स्टेशनमध्ये दाखल होणारे विविध गुन्ह्यांचा तपास पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी किंवा वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे उपलब्ध अधिकारी व अंमलदार यांच्या मदतीने पूर्ण करणे. त्याचप्रमाणे ज्या प्रकरणांमध्ये दंडाधिकाऱ्याकडून आदेश मिळाल्याखेरीज पोलीसांना कार्यवाही करणे शक्य होणार नाही. अशा प्रकरण नसतील तर आदेशासाठी न थांबता ते त्या सर्व प्रकरणांमधील त्यांचे कार्य तावडतोब सुरु करतील. ज्यावेळी पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी किंवा वरिष्ठ निर्देश देतील, त्या त्या वेळी तपासणी करतील व अशावेळी चौकी / दूरक्षेत्र मधील त्यांच्या अंमलदारांना त्यांच्या कर्तव्यावद्दल सूचना देतील, त्यांच्या हाताखालील अंमलदारांनी कर्तव्यात केलेल्या चुका त्यांच्या निदर्शनास आणून देतील. हद्दीतील धार्मिक कार्यक्रम, उत्सव, बंदोबस्त पोलीस स्टेशन अधिकारी किंवा वरिष्ठांचे आदेशानुसार शांततेत पार पाडणे तसेच पोलीस नियमावली 1999 चे भाग 02 व 03 प्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 प्रमाणे मुंबई पोलीस कायदा, 1951 प्रमाणे कार्य व कर्तव्य पार पाडावे.
9	सहाय्यक पोलीस उप निरीक्षक, सपोफौ	सपोफौ हे त्यांचे वरिष्ठ म्हणून नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या आदेशाच्या अधीन असतात. हवालदारांना नेमून दिलेल्या विभागातील मर्यादेमध्ये त्यांना दुय्यम असणारे सर्व पोलीस अंमलदारांकडून आदेश पालन करुन घेण्यास ते जबाबदार असतात. त्यांचे विभागात घडणारे सर्व गुन्हे किंवा घटना घडणार असल्यास त्या संबंधित संभाव्य माहिती वरिष्ठांना कळविणे गरजेचे असते. विभागातील काही क्षेत्रांचा गस्तप्रकार पोलीस हवालदार यांचेकडे असेल त्यावेळी त्या सर्व बाबींमध्ये ग्रामस्थांच्या एकविचाराने कृती करतील. पोलीस कार्यरत असणाऱ्या अधिकारी यांना त्यांचे गुन्हे तपास कामकाजात मदत करणे, हद्दीतील धार्मिक कार्यक्रम, उत्सव, बंदोबस्त शांततेत पार पाडणे तसेच वरिष्ठांनी दिलेल्या आदेश, सूचनांची तातडीने अंमलबजावणी करणे प्रसंगी गुन्हा तपास करणे तसेच पोलीस नियमावली 1999 चे भाग 02 व 03 प्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 प्रमाणे मुंबई पोलीस कायदा, 1951 प्रमाणे कार्य व कर्तव्य पार पाडावे.
10	पोलीस हवालदार	अ) पोलीस हवालदार हे त्यांचे वरिष्ठ म्हणून नेमलेल्या फौजदारांच्या आणि पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाच्या अधीन असतात. हवालदारांना नेमून देण्यात येईल त्या प्रभाराच्या मर्यादेमध्ये त्यांना दुय्यम असणाऱ्या सर्व पोलीसांकडून आज्ञा पालन करुन घेण्यास ते जबाबदार असतात. ब) पोलीस हवालदारांनी त्यांचा प्रभारात घडणारे सर्व गुन्हे आणि दखलपात्र अपराध घडणार असणे संबंधीची कोणतीही संभवनियता त्यांच्या फौजदारांना कळविणे आवश्यक असते. परंतु, अपराध्यांना शोधून त्यांना पकडण्यासाठी आवश्यक ती चौकशी सुरु करण्यासाठी त्यांना आदेश मिळविण्यासाठी त्यांनी थांबून राहता कामा नये. क) गुन्ह्यास प्रतिबंध करताना व सुव्यवस्था राखताना हवालदार, त्यांचे वरिष्ठ अधिकारी त्यांना देतील अशा आदेशाचे पालन करतील. ड) अचानक किंवा संशयास्पद रीतीने झालेल्या मृत्यूच्या बाबतीत हवालदार, किंवा हवालदार हजर नसेल तर शिपाई / अंमलदार त्याला फौजदाराकडून किंवा अन्य वरिष्ठ अधिकाऱ्याकडून आदेश मिळेपर्यंत प्रेत जाळण्यास, पुरविण्यास किंवा (पारश्यांच्या प्रथेप्रमाणे) टाकून देण्यास प्रतिबंध करतील. इ) गांवातील विशिष्ट नाक्यांच्या किंवा गस्तक्षेत्रांचा प्रभार हवालदारांकडे असेल त्यावेळी ते पोलीस व्यवस्था विषयक सर्व बाबींमध्ये ग्रामपोलीस प्रमुखां बरोबर एक विचाराने कृती करतील. ई) हाताखालील अंमलदारांनी देखील कर्तव्यात केलेल्या हयगयीची आणि कोणत्याही आदेशाची अवज्ञा केल्याची किंवा त्यांच्या इतर गैरवर्तनाची सर्व प्रकरणे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या तात्काळ निदर्शनास आणून देण्यास हवालदार जबाबदार असतात. फ) हवालदार हे फौजदारांचे सहाय्यक असतात आणि त्यांनी फौजदारांना अंमलदारांची कवायत घेण्याच्या, शिकवण्याच्या कामात व नाक्यावर वारंवार गस्त घालण्याच्या कामात सहाय्य करावे. अंमलदारांची केलेली कोणतीही हयगय तावडतोब पोलीस निरीक्षक यांना कळवतील. तसेच त्यांच्या प्रशंसनीय कृतीही वरिष्ठांचे निदर्शनास आणून देतील.
11	पोलीस शिपाई	अ) गुन्ह्यास प्रतिबंध व त्याचा तपास करणे, कायदा व सुव्यवस्था राखणे, फौजदार प्रक्रिया संहिता दंडाधिकाऱ्याचे वॉरंटस् आवश्यक असल्यास त्याबाबतीत वॉरंटवर अपराध्यांना पकडणे, त्यांच्या ताब्यात देण्यात येतील असे कैदी, निधी किंवा खाजगी व सरकारी मालमत्ता यांच्या सोबत सरक्षण म्हणून जाणे व त्यावर पहारा करणे आणि मुंबई पोलीस अधिनियम, 1951 च्या नियम, 22 अन्वये पोलीस अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार हवालदाराने वरिष्ठ अधिकारी आदेश देतील अशी पोलीस व्यवस्थे विषयक कामे शिपाई पार पाडतील.

Scanned with OKEN Scanner

		ब) ज्या गुन्ह्यासाठी पोलीस वॉरंटवाचून अटक करु शकतात, अशा कोणताही गुन्हा घडल्यावर शिपायाने आदेशाची वाट न पाहता सहकाऱ्यांच्या माहितीसाठी ताबडतोब आणि व्यवहार्य असेल तेथे लेखी स्वरुपात अहवाल द्यावा. क) आग लागल्याच्या किंवा इतर कोणत्याही संकटाच्या प्रसंगी सहाय्य करणे व जनतेच्या सुरक्षिततेसाठी आवाक्यात असेल ती प्रत्येक खबरदारी घ्यावी. हे देखील अंमलदारांचे कर्तव्य असेल.
12	पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग	01) पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग हे त्यांची जेथे नियुक्ती आहे तेथील विभागाचे थेट प्रभारी अधिकारी असतात. 02) पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग हे प्रशासकीय बाबतीत पोलीस अधीक्षक यांच्या नियंत्रणाखाली असतील आणि तांत्रिक बाबतीत अपर पोलीस महासंचालक, दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नियंत्रणाखाली कामकाज पाहतात. 03) पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग हे त्यांच्या प्रभारातील सर्व वाहनांच्या अधून मधून पूर्ण तपासणी करीता आणि शक्यतोवर नेहमीच वाहने सुस्थितीत ठेवण्यास जबाबदार असतील 04) पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग हे त्यांच्या प्रभारातील खालील सर्व शाखांवर ते नियंत्रण ठेवून देखरेख करतील. अ) वाहन दुरुस्ती आणि परीक्षण ब) भांडाराचा व्यवहार, पेट्रोल, ऑईल आणि वंगण व सुट्टे भाग इत्यादी क) मोटार परिवहनचे विविध अभिलेख ठेवणे ड) प्रशासकीय अभिलेख ठेवणे 05) पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग हे त्यांच्या प्रभारातील मोटार परिवहन विभागाची तपासणी वरिष्ठांनी करण्यासाठी जरुर ती व्यवस्था ते करतील आणि सर्व भांडार, खतावणी, लेजर आणि इतर मोटार परिवहन अभिलेख अद्यावत ठेवतील, तसेच जरुर ती कार्यवाही घेतील. सूचना आणि तपासणी टिपण्णीची पूर्तता करतील 06) पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग हे त्यांच्या कनिष्ट अंमलदारांना योग्यप्रकारे कर्तव्य वाटप केले जाते, याबाबत ते खात्री करतील आणि त्यांची कार्यक्षमता व शिस्त राखतील 07) पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग हे अनियमितता, बेशिस्त वाहनांचा गैरवापर, अपघात इत्यादी बाबतची प्रकरणे ते न चुकता आपल्या वरिष्ठ अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देतील तसेच शासकीय वाहने लिलाव करणे पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग यांचे अधिपत्याखाली खालील कर्मचारी काम करतात. 01) मोटार परिवहन पर्यवेक्षक 02) पोलीस हवालदार चालक -यांत्रिकी, मेकॅनिक
13	पत्रव्यवहार शाखा	प्रमुख लिपीक हे पत्रव्यवहार शाखेचे प्रमुख असतात. शासकीय कामकाज करतांना त्यांचे अधिनस्त प्रशासकीय कर्मचारी (लिपीक) यांना मौलिक मार्गदर्शन करतात. पोलीस अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण व इतर कोर्सेस बाबतची प्रकरणे हाताळणे तसेच पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उप निरीक्षक यांच्याआस्थापनेशी निगडीत सर्व कामे व तद् अनुषंगाने पत्रव्यवहार करणे, शासन, पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महानिरीक्षक यांचेकडून प्राप्त होणाऱ्या अर्जाशी निगडीत कामे पाहणे, प्रशासकीय अधिकारी व प्रशासकीय कर्मचारी (लिपीक), गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्याशी निगडीत वयाच्या 50-55 च्या पुनर्विलोकन संबंधित पत्रव्यवहार करणे. मोटार परिवहन शाखेशी निगडीत कामकाज हाताळणे, अर्धशासकीय पत्रे, तारांकित व अतारांकित प्रश्न, शासन संदर्भ, वरिष्ठ कार्यालयाकडून येणाऱ्या संदर्भाची नोंदवही अद्यावत ठेवणे, वस्त्रभांडार, शस्त्रसामुग्री, दूरध्वनी इत्यादी बाबत कामकाज हाताळणे, पुनर्रचनेचे प्रस्ताव सादर करणे, अस्थायी पदांना मुदतवाढ मिळणेकामी वरिष्ठ कार्यालयास प्रस्ताव सादर करणे, पोलीस अधिकारी, प्रशासकीय कर्मचारी, गट-ड संवर्गातील कर्मचारी यांची जात पडताळणी प्रकरणे हाताळणे, प्रशासकीय कर्मचारी यांच्या विभागीय परीक्षेशी निगडीत पत्रव्यवहार करणे, इमारत बांधकामचे अनुषंगाने संबंधित कार्यालयास प्रस्ताव सादर करणे, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई (मॅटशी) निगडीत प्रकरणे हाताळणे, जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून त्यांचे शाखेशी निगडीत प्रकरणपरत्वे प्रमुख लिपीक हे कर्तव्य पार पाडतात इत्यादी विविध प्रकारचे काम पत्रव्यवहार शाखेमार्फत करण्यात येतात. पत्रव्यवहार शाखेचे कामकाज हे कार्यालय अधीक्षक यांच्या नियंत्रणाखाली असते.
14	लेखा शाखा	प्रमुख लिपीक हे लेखा शाखेचे प्रमुख असतात. शासकीय कामकाज करतांना त्यांचे अधिनस्त प्रशासकीय कर्मचारी (लिपीक) यांना मौलिक मार्गदर्शन करतात. वार्षिक अंदाजपत्रक व त्याअनुषंगाने सर्व प्रकारचे कामकाज हाताळणे, देयक नोंदवही अद्यावत ठेवणे, लेखा शाखेशी निगडीत वार्षिक तपासणी अहवालातील आक्षेपाची पूर्तता करणे, निवृत्तीवेतन लाभ प्रदानाची नोंदवही अद्यावत ठेवणे, निवृत्तीवेतन प्रकरणे हाताळणे, पोलीस अधिकारी, अंमलदार, प्रशासकीय कर्मचारी, गट-ड कर्मचाऱ्यांचे वेतन, प्रवास भत्ता, आहार भत्ता, साप्ताहिक सुट्टी देयके तयार करणे व पोलीस पाटील मानधन देयक तयार करणे, सर्व प्रकारच्या अग्रीमाचे कामकाज पाहणे, वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके तयार करणे, देयकांचे मासिक विवरणपत्र तयार करुन वरिष्ठांना सादर करणे, जन माहिती अधिकारी तथा

Scanned with OKEN Scanner

		कार्यालय अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून त्यांचे शाखेशी निगडीत प्रकरणपरत्वे प्रमुख लिपीक हे कर्तव्य पार पाडतात असे विविध प्रकारचे कामकाज लेखा शाखेमार्फत करण्यात येतात. लेखा शाखेचे कामकाज हे कार्यालय अधीक्षक यांच्या नियंत्रणाखाली असते.
15	आस्थापना शाखा	प्रमुख लिपीक हे आस्थापना शाखेचे प्रमुख असतात. शासकीय कामकाज करतांना त्यांचे अधिनस्त प्रशासकीय कर्मचारी (लिपीक) यांना मौलिक मार्गदर्शन करतात. पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रिया पूर्ण करणे, रोस्टर लिहिणे इत्यादी महत्त्वाचे कामकाज, पोलीस शिपाई, पोलीस हवालदार, सहाय्यक पोलीस फौजदार यांच्या पदोन्नती व सर्व प्रकारच्या बदल्यांबाबतचे कामकाज करणे, सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करणे, अंमलदारांच्या सेवापटात सर्व प्रकारच्या नोंदी डकविणे, हस्त नोंदवही अद्यावत ठेवणे, आशांकित कक्ष व शीट रिमार्कस याबाबतची कामे पाहणे, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई (मॅटशी) निगडीत प्रकरणे हाताळणे, पोलीस अंमलदारांचे प्रशिक्षण व इतर कोर्सेस बाबतची प्रकरणे हाताळणे, जिल्हा पोलीस प्रसिध्दी पत्रक वेळोवेळी प्रसिध्द करणे, जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून त्यांचे शाखेशी निगडीत प्रकरणपरत्वे प्रमुख लिपीक हे कर्तव्य पार पाडतात असे विविध प्रकारचे कामकाज आस्थापना शाखेमार्फत करण्यात येतात. आस्थापना शाखेचे कामकाज हे कार्यालय अधीक्षक यांच्या नियंत्रणाखाली असते.
16	नोंदणी शाखा	प्रमुख लिपीक हे नोंदणी शाखेचे प्रमुख असतात. शासकीय कामकाज करतांना त्यांचे अधिनस्त प्रशासकीय कर्मचारी (लिपीक) यांना मौलिक मार्गदर्शन करतात. कार्यालयास शासकीय कार्यालयाकडून, जनतेकडून प्राप्त होणारे किरकोळ स्वरुपाचे अर्ज, पत्रव्यवहाराची नोंद ई-ऑफिस प्रणालीद्वारे करुन संबंधित पोलीस कार्यालयास वा शाखेस पाठविणे, या कार्यालयास दुसऱ्या कार्यालयाकडून, वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त होणारे विविध प्रकारचे टपाल-गोपनीय, महत्त्वाचे वगैरे वरिष्ठांचे अवलोकनार्थ सादर करुन त्यांचे स्वाक्षरी व शेऱ्याअंती संबंधित पोलीस कार्यालय वा शाखेस पाठविणे, टपाल / हशिलाची नोंदवही अद्यावत ठेवणे, शासकीय खरेदीची प्रक्रिया विहीत पध्दतीचा अवलंब करुन पार पाडणे, जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून त्यांचे शाखेशी निगडीत प्रकरणपरत्वे प्रमुख लिपीक हे कर्तव्य पार पाडतात असे विविध प्रकारचे कामकाज नोंदणी शाखेमार्फत करण्यात येतात. नोंदणी शाखेचे कामकाज हे कार्यालय अधीक्षक यांच्या नियंत्रणाखाली असते.
17	विभागीय चौकशी शाखा	प्रमुख लिपीक हे विभागीय चौकशी शाखेचे प्रमुख असतात. शासकीय कामकाज करतांना त्यांचे अधिनस्त प्रशासकीय कर्मचारी (लिपीक) यांना मौलिक मार्गदर्शन करतात. पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी त्यांचे कर्तव्यात केलेल्या कसुरीच्या अनुषंगाने ज्ञापन देणे, प्राथमिक चौकशी चालविणे, विभागीय चौकशी चालविणे, अंतिम समाकलन अहवालाच्या आधारे अंतिम आदेश घेणे. प्राथमिक चौकशी व विभागीय चौकशीची माहिती / आकडेवारी प्रत्येक महिन्यास विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करणे. शिक्षेची नोंद संबंधित पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे सेवापटात डकविणे, जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून त्यांचे शाखेशी निगडीत प्रकरणपरत्वे प्रमुख लिपीक हे कर्तव्य पार पाडतात. असे विविध प्रकारचे कामकाज विभागीय चौकशी शाखेमार्फत करण्यात येतात. विभागीय चौकशी शाखेचे कामकाज हे कार्यालय अधीक्षक यांच्या नियंत्रणाखाली असते.
18	अर्ज शाखा	अर्ज शाखेचे प्रमुख हे पोलीस उप निरीक्षक / सहाय्यक पोलीस निरीक्षक / पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी असतात व त्यांना मदतीसाठी पोलीस अंमलदार असतात. अर्ज शाखेकडे विविध पोलीस स्टेशन, शाखांतर्गत प्राप्त स्थानिक तक्रार अर्ज, आपले सरकार पोर्टल मार्फत प्राप्त अर्ज, शासनाकडे, मंत्रालय, पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर यांचेकडील अर्ज प्राप्त होतात. अर्ज शाखेस प्राप्त होणारे अर्ज हे संबंधित पोलीस कार्यालय व शाखेस पुढील उचित कार्यवाहीस्तव पाठविण्यात येतात. तसेच जिल्हा / विभागीय लोकशाही दिनी प्राप्त अर्जांवर तसेच जिल्हा / विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीतील अर्जांवर अहवाल सादर करणे ही कामे करण्यात येतात.
19	कल्याण शाखा	पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी हे कल्याण शाखेचे प्रभारी म्हणून कर्तव्य पार पाडतात. पोलीस कल्याण निधीमधून पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना विविध प्रकारचे अनुदान वाटप करणे, महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेचे कामकाज व तत्संबंधी कामे तसेच सबसिडीअरी कॅन्टीन पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसाठी चालविण्यात येते. पोलीस कल्याण निधी वृध्दींगत करण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करुन निधी जमा करण्यात येतो. विविध कार्यक्रमांसाठी आवश्यक साहित्याची खरेदी करणे, क्रीडा साहित्य खरेदी करणे इत्यादी विविध कामे पार पाडली जातात.
20	जिल्हा विशेष शाखा	पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी हे जिल्हा विशेष शाखेचे प्रभारी म्हणून कर्तव्य पार पाडतात. जिल्ह्यातील सशुल्क पोलीस बंदोबस्त, चारित्र्य पडताळणी, शस्त्र परवान्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर करणे, जिल्ह्यात संभाव्य आत्मदहन, आंदोलन करु नये याकामी संबंधित व्यक्तीस भेटून त्याचे मन परिवर्तन करणे, महत्त्वाच्या व अति महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटी दरम्यान यथोचित बंदोबस्त जिल्ह्यातून पुरविणे, मोठे उत्सव, सण यासाठी प्रकरणपरत्वे परिक्षेत्रातून बंदोबस्ताची मागणी पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करणे, धार्मिक व जातीय तेढ निर्माण होणार नाही यादृष्टीने प्रतिबंधक उपाययोजना करणे, पुतळयांची पाहणी करणे, वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली विविध प्रकारचे महत्त्वाचे कर्तव्ये पार पाडणे.

Scanned with OKEN Scanner

21	परकीय नागरीक नोंदणी विभाग (F.R.O.)	पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी हे परकीय नागरीक नोंदणी विभागाचे प्रभारी म्हणून कर्तव्य पार पाडतात. जिल्ह्यातील पारपत्र पडताळणीचे कामकाज पाहणे, परकीय नागरीक / विद्यार्थी पुण्यात आल्यानंतर त्यांची नोंदणी करणे, व्हिसा मुदतवाढ देणे आदी महत्वाची कामे परकीय नागरीक नोंदणी विभागामार्फत पार पाडण्यात येतात.
22.	सुरक्षा शाखा	पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी हे सुरक्षा शाखेचे प्रभारी अधिकारी म्हणून कर्तव्य बजावितात. सदर ठिकाणी जिल्ह्यातील मर्मस्थळे ठिकाणी भेट व आढावा घेणे, तसेच धरण, विमानतळ व मंदिर इत्यादी महत्वाच्या ठिकाणचे टोपोशीट, खासगी सुरक्षा अभिकरण परवाना कामी प्राप्त ऑनलाईन अर्ज पोलीस स्टेशन मार्फत पडताळणी करुन त्याचा अहवाल शासनास सादर करणे, जिल्ह्यातील मंदिर, मशिद, चर्च, गुरुद्वारा यांना बांधकाम करणेसाठी ना-हरकत दाखले तसेच अ, ब, क वर्गवारीमध्ये प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर करणे, आपत्ती व्यवस्थापन संबंधित आवश्यक ते कामकाज जिल्हाधिकारी, पुणे यांचे नियंत्रणाखाली पाहणे, पुणे ग्रामीण जिल्ह्यातील माजी सैनिक / सैनिक यांच्या अडीअडचणी त्यांचे अर्ज चौकशी व त्यांची बैठक आयोजित करणे, औद्योगिक प्रमंडळ यांचे समस्या विषयक तक्रारी निवारण करणे, प्रतिषिध्द क्षेत्रांचे प्रस्ताव शासनास सादर करणे आदी महत्वाची कामे सुरक्षा शाखेमार्फत पार पाडण्यात येतात.
23	कार्यालय अधीक्षक	कार्यालयीन कामकाजाचे पर्यवेक्षण करणे, देयकाचे आहरण व संवितरण करणे, प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे कार्यविवरण तपासणे, दप्तर तपासणी, प्रशासकीय अहवाल वरिष्ठांना सादर करणे, पोलीस कल्याण निधीची लेखा तपासणी करणे, डे बुक अचानक तपासणी करणे.
24	सहाय्यक लेखाधिकारी	पोलीस दलात कार्यरत सहाय्यक लेखा अधिकाऱ्यांच्या लेखा शाखा अंतर्गत प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीकोनातून पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडून सहाय्यक लेखा अधिकाऱ्यांकडे खालीलप्रमाणे लेखा पडताळणी विषयक कामे सोपविण्यात आली आहेत. i) वित्तीय अधिकाराच्या अनुषंगाने प्रस्ताव मंजूरीसाठी कार्यालय प्रमुख यांना सल्ला देणे ii) वित्तीय अधिकार मंजूरीचे प्रस्ताव तयार करुन ते मान्य करुन घेणे, iii) मुंबई पोलीस नियमावली, महाराष्ट्र आकस्मिकता खर्च नियम, महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम, महाराष्ट्र कोषागार नियम, मुंबई वित्तीय नियमावली व वित्तीय अधिकार प्रदान नियम यातील सर्व तरतुदींचा तंतोतंत अंमल होतो हे पाहणे. iv) अंदाज समिती / लोकलेखा समिती यांच्या बैठकांशी संबंधित माहिती शासनास सादर करणे व सदर बैठकांना उपस्थित राहून आवश्यकतेनुसार विभागप्रमुखांना सल्ला देणे v) दरमहा महसुली जमा व खर्चावर लक्ष ठेवणे vi) दरमहा महालेखापालांकडून आलेल्या खर्चाच्या विवरणाचा प्रत्यक्ष खर्चाशी ताळमेळ घालणे, तसेच तिमाही व वार्षिक खर्च ताळमेळ करणे vii) कर कपात सूचनांना वेळीच उत्तर देणे viii) महालेखापालांच्या पुढील अहवालातील लेखाशीर्ष / परिच्छेदांवर कार्यवाही करुन महालेखापालांकडून ते अभिप्राय घेऊन विधानमंडळ समितीच्या साक्षीसाठी शासनास सादर करणे. (अ) विनियोजन लेखा अहवाल, (ब) नागरी अहवाल, (क) महसुली जमा अहवाल, (ड) वाणिज्यिक अहवाल, ix) विभागाच्या खरेदी प्रक्रियेमध्ये सहभाग घेणे x) कामांच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे व निधीची व्यवस्था करणे xi) अर्थसंकल्पीय अंदाज, सुधारीत अंदाज, पूरक मागण्या, खर्चाच्या नवीन बाबी आकस्मिकता निधीतून अग्रीमांना प्रस्ताव इत्यादी xii) कॅश फ्लो तयार करणे (मुख्य लेखाशीर्ष व उपशीर्ष निहाय) xiii) निधीचे वितरण शासनाकडून प्राप्त करुन घेणे xiv) वितरण प्राप्त झाल्यानंतर नियंत्रक अधिकारी निहाय त्यांचे वाटप करणे xv) अंतर्गत लेखापरिक्षण करणे xvi) खर्चाच्या प्रस्तावासंबंधी (देयके) प्री ऑडीट स्वरुपाची भूमिका बजावणे xvii) कार्यक्रम अंदाजपत्रकाची माहिती विहीत कालावधीत तयार करुन शासनास पाठविणे xviii) लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेदावर / मुद्यांवर विहित वेळेत कार्यवाही करुन परिच्छेद निकाली काढणे xix) लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेदावर कार्यवाही करुन त्यांचे प्रारुप लेखा परिच्छेद होणार नाहीत यादृष्टीने महालेखापालांना खुलासा करुन ते निकाली काढून घेणे व लेखा परिच्छेदाचा समावेश महालेखापालांच्या अहवालात होणार नाही, याची दक्षता घेणे xx) संक्षिप्त देयकावर काढलेल्या रक्कमांची तपशीलवार देयके सादर करणे / करुन घेणे xxi) स्वीय प्रपंजी लेखे ऑपरेट करणे xxii) कार्यालयातील स्टॉक रजिस्टर्स पोलीस नियमावलीतील तरतुदीनुसार, तसेच शासन नियमानुसार ठेवणे xxiii) रोख शाखांची नियतकालिक तपासणी

Scanned with OKEN Scanner

		xxiv) साधनसामुग्री व यंत्रसामुग्री सातत्याने चालू राहील याची व्यवस्था करुन अंमलबजावणीत ठेवणे xxv) वाहने, यंत्रणसामुग्री, साधनसामुग्री इत्यादी मोडीत काढण्यासाठी परवानगी व प्रत्यक्ष मोडीत काढण्याची प्रक्रिया पूर्ण करणे xxvi) पोलीस विभागास देय असणाऱ्या रक्कमांच्या वसुलीवर लक्ष ठेवून वसुली वेळेत होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे xxvii) भविष्य निर्वाह निधी अग्रीम (परतावा व ना-परतावा), घरबांधणी अग्रीम, वाहन अग्रीम, संगणक अग्रीम इत्यादी मंजूरी प्रकरणे हाताळणे xxviii) आहरण व संवितरण अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडणे xxix) निवृत्ती वेतन प्रकरणे हाताळणे xxx) जी.आय.एस. व सी.जी.आय.एस. (आय.पी.एस. अधिकारी करीता) याबाबतची प्रकरणे हाताळणे
25	प्रमुख लिपीक	प्रमुख लिपीक हे प्रशासकीय शाखा जसे की, पत्रव्यवहार शाखा, लेखा शाखा, आस्थापना शाखा, नोंदणी शाखा, विभागीय चौकशी शाखा यांचे प्रमुख म्हणून त्यांचे कर्तव्य पार पाडतात. संबंधित शाखेपुढे नमूद केलेप्रमाणे ते त्यांची कर्तव्य पार पाडतात. तसेच केंद्रीय माहितीचा अधिकार अंतर्गत जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून कर्तव्य बजावितात.
26	वरिष्ठ लिपीक	नेमून दिलेल्या कामकाजावर नियमास अनुसरुन टिपण्णी तयार करणे व वरिष्ठांचे मार्फतीने सादर करुन प्रकरणांची विहीत मुदतीत निर्गती करणे, संबंधित शाखेचे प्रमुख लिपीक यांचे अधिनस्त व मार्गदर्शनाखाली कामकाजाची पूर्तता करणे.
27	कनिष्ठ लिपीक	प्रमुख लिपीक व वरिष्ठ लिपीक यांना नेमून दिलेल्या कामकाजात यथोपरी मदत करणे, आवक-जावक नोंदी, मराठी, इंग्रजी संगणकावर टंकलेखन करणे तसेच इतर महत्वपूर्ण स्वरुपाच्या कामकाजात मदत करणे

- **कलम क्रमांक 04 (1) (ख) (तीन) :-**

निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली

- **निर्णय घेण्याच्या पध्दती :-**

शासन, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांचेकडून प्राप्त झालेले किंवा वरिष्ठ कार्यालयांनी ठरवून दिलेल्या परिपत्रकाच्या अधीन राहून या कार्यालयास प्राप्त होणाऱ्या प्रकरणांचा निपटारा करण्यात येतो वा प्रकरणपरत्वे योग्य तो निर्णय घेण्यात येतो.

- **पर्यवेक्षण :-**

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचे कामकाज वाचक शाखेमार्फत करण्यात येऊन, प्रशासकीय स्वरुपाचे कामकाज कार्यालय अधीक्षक यांचेमार्फत पर्यवेक्षण करणे.

- **उत्तरदायित्व :-**

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस अधीक्षक हे त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांना वेळोवेळी योग्य ते मौलिक मार्गदर्शन करणे, सूचना देऊन शांतता अबाधित ठेवतात. तेथील गुन्हेगारीवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन सर्व प्रकारच्या गुन्हेगारीवर प्रतिबंधक नियंत्रण ठेवणे, जिल्ह्यांतर्गत कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे प्रशासकीय कामकाज वेळेवर पार पाडणेबाबत योग्य ती कार्यवाही करणे, त्याप्रमाणे सर्व कार्यपध्दती वरिष्ठ कार्यालयाशी योग्य समन्वय साधून अशाप्रकारचे उत्तरदायित्व पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाचे आहे.

Scanned with OKEN Scanner

कलम क्रमांक 04 (1) (ख) (चार) :-

- **ठरविण्यात आलेली मानके :-**

01) वाचक शाखेत गुन्ह्यांचे माहितीबाबत दैनंदिनरीत्या पाठपुरावा करणे, साप्ताहिक, पंधरवाडयाला व मासिक अहवाल वेळोवेळी सादर करणे, अहवाल पाठविण्याचा नियमित आढावा घेऊन वरिष्ठांना माहिती सादर करणे
02) प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या कामाचे दैनंदिन पर्यवेक्षण करुन त्यांचेकडून वेळेत कामाची पूर्तता करवून घेणे
03) प्रत्येक महिन्यास कार्यालय अधीक्षक यांनी प्रमुख लिपीक, वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक यांची पोलीस अधीक्षक यांचेसोबत बैठक घेऊन चर्चा करणे व कामकाजाचा आढावा घेणे. अहवाल पाठविण्याचा नियमित आढावा घेणे, वरिष्ठांना अपेक्षित माहिती सादर करणे

कलम क्रमांक 04 (1) (ख) (पाच) :-

कर्मचाऱ्यांनी त्यांचे कामकाजाचे निर्मुलन करण्यासाठी वापरावयाचे नियम ,अटी, निर्देश पुस्तिका आणि अभिलेख

